दैनिक
सत्याचे प्राईम्स
# जन सम्राट टाईम्स

Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। मंगळवार, दि. २१जूलै २०२६ । वर्ष १ । अंक १०३ । पाने २ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

भडगाव नगराध्यक्ष रेखा मालचे यांना मोठा दिलासा

(पान २ वर)



शिक्षण व्यवस्थेविरोधात राजधानीत अभूतपूर्व आंदोलन; हजारो विद्यार्थी संसदेकडे धावले • सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह

# संसदेच्या दारात तरुणांचा प्रचंड उद्रेक!

## 'नीट' पेपरफुटीप्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी; सुरक्षा कवच भेदत आंदोलक संसद परिसरापर्यंत, लाठीमार-अश्रुधुरानंतरही संताप कायम

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली । देशातील शिक्षण व्यवस्थेतील कथित गैरप्रकार, 'नीट' पेपरफुटी आणि परीक्षा प्रक्रियेतील अनियमिततेविरोधात उसळलेल्या विद्यार्थ्यांच्या संतापाने सोमवारी राजधानी दिल्ली हादरली. जंतर-मंतरवर महिनाभर सुरू असलेल्या आंदोलनानंतर हजारो विद्यार्थी आणि तरुणांनी संसदेकडे मोर्चा वळवत बहुस्तरीय सुरक्षा व्यवस्था भेदली. संसद भवनाच्या प्रवेशद्वारापर्यंत आंदोलक पोहोचल्याने राजधानीतील सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले.**





'कॉकरोच जनता पार्टी' (सीजेपी)च्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनाचा केंद्रबिंदू म्हणजे 'नीट' परीक्षेतील कथित गैरव्यवहार आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी. आंदोलकांनी रायसीना रोडमार्गे संसद भवनाकडे कूच करत जोरदार घोषणाबाजी केली. पोलिसांनी अनेक स्तरांवर उभारलेले बॅरिकेड्स आंदोलकांनी ओलांडल्याने काही काळ संसद परिसरात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली.

पावसाळी अधिवेशनाचा पहिलाच दिवस असल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदींसह केंद्रीय मंत्री आणि खासदार संसदेत उपस्थित असतानाच आंदोलन संसदेच्या प्रवेशद्वारापर्यंत पोहोचले. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी लाठीमार, अश्रुधुराच्या नळकांड्या आणि मोठा बंदोबस्त तैनात केला. मात्र, संतप्त विद्यार्थ्यांचा आक्रोश थोपविण्यात सुरक्षा यंत्रणांना

- **पोलिस-आंदोलक जखमी**
- **अनेकांना ताब्यात**
- **इंटरनेट सेवाही तात्पुरती बंद**

मोठी कसरत करावी लागली. दिल्ली पोलिसांच्या माहितीनुसार, या आंदोलनात पाच आयपीएस अधिकाऱ्यांसह ११८ पोलिस कर्मचारी जखमी झाले असून ६० हून अधिक आंदोलकही जखमी झाले आहेत. ७० ते १०० आंदोलकांना ताब्यात घेण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. दुसरीकडे, आंदोलनकर्त्यांनी १०० हून अधिक आंदोलक रुग्णालयात दाखल असल्याचा आणि हजाराहून अधिक जण जखमी झाल्याचा दावा केला आहे. तसेच सुरक्षा दलांच्या अनेक वाहनांचे नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे. आंदोलनादरम्यान संसद भवनाच्या सर्व प्रवेशद्वारांवर काही काळासाठी हालचाल बंद करण्यात आली. संसदेच्या सुरक्षेसाठी दिल्ली पोलीस, सीआरपीएफ, सीआयएसएफ आणि निमलष्करी दलाचे हजारो जवान तैनात असूनही आंदोलक संसद परिसरापर्यंत पोहोचल्याने सुरक्षा यंत्रणांच्या नियोजनावर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

दरम्यान, आंदोलन हिंसक वळणावर गेल्यानंतर संसद परिसर आणि आसपासच्या चार ते पाच किलोमीटर परिसरातील मोबाईल इंटरनेट सेवा तात्पुरती बंद करण्यात आली. संध्याकाळनंतर परिस्थिती नियंत्रणात आल्यानंतर इंटरनेट सेवा पूर्ववत करण्यात आली.

> नरेंद्र मोदी हे देशाच्या इतिहासातील सर्वाधिक युवा-विरोधी पंतप्रधान आहेत. केंद्र सरकार केवळ युवकांचे प्रश्न सोडवण्यात अपयशी ठरले नाही तर ते त्यांच्यावरच हल्ला करत आहे.
> – **राहुल गांधी,** विरोधी पक्षनेते

या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या प्रारंभी केलेल्या भाषणात "तथ्ये आणि तर्क मजबूत असतील तर गोंधळाची गरज नसते," असे सांगत अधिवेशन रचनात्मक पद्धतीने पार पाडण्याचे आवाहन केले. तर विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर टीका करत, "युवकांच्या प्रश्नांकडे सरकार दुर्लक्ष करत असून त्यांच्यावरच दडपशाही केली जात आहे," असा आरोप केला. देशभरात या आंदोलनाचे पडसाद उमटले असून महाराष्ट्रासह अनेक राज्यांत विद्यार्थी संघटना आणि विविध सामाजिक संघटनांनी आंदोलनाला पाठिंबा दर्शवित निदर्शने केली. संसदेपर्यंत पोहोचलेल्या या आंदोलनामुळे देशातील शिक्षण व्यवस्था, परीक्षा प्रणाली आणि युवकांच्या प्रश्नांवर पुन्हा एकदा राष्ट्रीय स्तरावर व्यापक चर्चा सुरू झाली आहे.

## सुकी नदीच्या खोल डोहात बुडून १७ वर्षीय तरुणाचा दुर्दैवी मृत्यू;

### यावलच्या फेगडे कुटुंबावर शोककळा

जन सम्राट टाईम्स



**यावल | प्रतिनिधी:** पर्यटनाचा आनंद क्षणार्धात शोकांतिकेत बदलल्याची हृदयद्रावक घटना यावल तालुक्यात घडली. सातपुडा जंगल परिसरातील हरिपुरा शिवारातील सुकी नदीच्या खोल डोहात बुडून १७ वर्षीय जयेश संजय फेगडे याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे यावल शहरासह परिसरात शोककळा पसरली असून, होमगार्ड जवानाच्या एकुलत्या एक मुलाचा मृत्यू झाल्याने फेगडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मृत जयेश संजय फेगडे (वय १७, रा. महाजन गल्ली, यावल) हा यावल येथील होमगार्ड जवान संजय सिताराम फेगडे यांचा एकुलता एक मुलगा होता. रविवारी तो आपल्या चुलत भाऊ व वहिनीसोबत सातपुडा जंगलातील हरिपुरा शिवारात असलेल्या पाझर तलाव परिसरात पर्यटनासाठी गेला होता.

## आर्टिस्ट व्हिजन व रीडर्स क्लबतर्फे चित्रकलेच्या माध्यमातून पर्यावरण जनजागृती

जन सम्राट टाईम्स



**भुसावळ | प्रतिनिधी :** बालपणा पासूनच वृक्ष लागवड आणि संवर्धनाची जाणीव मुलांच्या मनात रुजविणे ही काळाची गरज असून, पर्यावरण संवर्धनासाठी धडपडणाऱ्या हातांना समाजाने साथ द्यावी, असे प्रतिपादन प्रा. डॉ. जतीन मेढे यांनी केले. भुसावळ शहरातील आर्टिस्ट व्हिजन आणि रीडर्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने श्रद्धेय श्यामाप्रसाद मुखर्जी उद्यानात आयोजित पर्यावरण जनजागृती कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्रा. डॉ. मेढे यांनी जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या "वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे" या अभंगाचा संदर्भ देत वृक्षांशी नातं जोडण्याची आणि त्यांचे संवर्धन करण्याची गरज अधोरेखित केली. बदलत्या पर्यावरणीय परिस्थितीत पुढील पिढीचे भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी आजपासूनच वृक्ष लागवड व संवर्धनाची संस्कृती रुजविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे आयोजन ज्येष्ठ कलाशिक्षक राजेंद्र जावळे यांनी केले होते. चित्रकलेच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षणाचा संदेश बालकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला.

प्रा. डॉ. मेढे यांनी राजेंद्र जावळे यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक करत साहित्य, संगीत, चित्रकला, नृत्य, नाट्य आणि विविध सामाजिक उपक्रमांमधील त्यांच्या सातत्यपूर्ण योगदानाचा गौरव केला. समाजहितासाठी उपक्रमशील राहणारे शिक्षक म्हणून त्यांनी त्यांचा उल्लेख केला. चित्रकलेसारख्या सर्जनशील माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा हा उपक्रम बालकांसाठी प्रेरणादायी ठरल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले.

## मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त जनआरोग्य शिबिराचे आयोजन

### शेकडो रुग्णांची मोफत तपासणी



जन सम्राट टाईम्स

**पिंपळनेर, धुळे | प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रमाला प्राधान्य देत पिंपळनेर येथे भव्य जनआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. सुहरी हॉस्पिटल, आदित्य फाउंडेशन आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या शिबिरात पिंपळनेर शहरासह ग्रामीण भागातील शेकडो नागरिकांनी सहभाग घेत मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचारांचा लाभ घेतला. या आरोग्य शिबिरात सर्वसामान्य नागरिकांच्या विविध आजारांची अत्याधुनिक पद्धतीने तपासणी करण्यात आली. रुग्णांना शुगर, ईसीजी, लिपिड प्रोफाइल, हृदयरोग, सिरम युरिक ॲसिड, स्त्रीरोग, अस्थिरोग तसेच इतर अनेक आजारांच्या मोफत तपासण्या करण्यात आल्या. तपासणीनंतर आवश्यक रुग्णांना मोफत औषधांचे वितरणही करण्यात आले. यावेळी डॉ. जितेश चौरे यांनी सांगितले की, तपासणीनंतर ज्या रुग्णांना शस्त्रक्रियेची आवश्यकता भासेल, अशा रुग्णांवर विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून मोफत शस्त्रक्रिया करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. या शिबिराचे विशेष आकर्षण म्हणजे पिंपळनेर नगर परिषदेच्या नगराध्यक्षा डॉ. योगिता चौरे यांनी स्वतः उपस्थित राहून रुग्णांची आरोग्य तपासणी केली. त्यांनी रुग्णांशी संवाद साधत त्यांच्या आरोग्यविषयक समस्यांची माहिती घेतली आणि आवश्यक ते वैद्यकीय मार्गदर्शन केले. त्यांच्या या सेवाभावी भूमिकेचे उपस्थित नागरिकांनी कौतुक केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त केवळ औपचारिक कार्यक्रम न करता जनतेच्या आरोग्याची काळजी घेणारा असा समाजहिताचा उपक्रम राबविण्यात आल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात आले. "वाढदिवस साजरा करण्यापेक्षा जनसेवा महत्त्वाची" हा संदेश या शिबिरातून देण्यात आल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली. पिंपळनेरसह परिसरातील ग्रामीण भागातून मोठ्या संख्येने नागरिक या शिबिरात सहभागी झाले. अनेक रुग्णांनी प्रथमच विविध तज्ज्ञ डॉक्टरांकडून एकाच ठिकाणी मोफत तपासणी करून घेतल्याने आयोजकांचे आभार मानले. आरोग्याबाबत जनजागृती होण्यासोबतच गरजू रुग्णांना वेळेवर उपचार मिळण्यास या शिबिराची मोठी मदत झाल्याचे नागरिकांनी सांगितले. या शिबिरात हृदयरोग तज्ज्ञ डॉ. दीपक शिंदे, अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. कोमल अहिरराव, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. जीवन शर्मा यांच्यासह विविध क्षेत्रातील वैद्यकीय तज्ज्ञांनी सेवा दिली.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# सोनम वांगचूक यांच्या मागण्या मान्य करा!

## जळगाव जिल्हा संविधान प्रेमी नागरिक मंचाचे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपतींना निवेदन

जन सम्राट टाईम्स




**जळगाव | प्रतिनिधी :**
प्रसिद्ध पर्यावरणवादी आणि शिक्षणविषयक प्रश्नांवर आंदोलन करणारे कार्यकर्ते सोनम वांगचूक यांच्या मागण्यांचा संविधानिक दृष्टिकोनातून विचार करून त्या मान्य कराव्यात तसेच देशातील विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, या मागणीसाठी जळगाव जिल्हा संविधान प्रेमी नागरिक मंचाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत भारताच्या राष्ट्रपतींना निवेदन देण्यात आले. निवेदनात देशातील स्पर्धा परीक्षांमध्ये सातत्याने घडणाऱ्या पेपरफुटीच्या घटनांबाबत तीव्र चिंता व्यक्त करण्यात आली आहे. विद्यार्थी अनेक महिने अथक परिश्रम करून परीक्षेची तयारी करतात. मात्र, परीक्षा होण्यापूर्वीच प्रश्नपत्रिका फुटल्याने परीक्षा रद्द अथवा पुढे ढकलल्या जातात. या प्रकारामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक, मानसिक आणि आर्थिक नुकसान होत असून त्यांच्या भविष्यावरही गंभीर परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, स्पर्धा परीक्षांतील गैरप्रकारांना आळा घालावा आणि या परिस्थितीची जबाबदारी निश्चित व्हावी, या मागण्यांसाठी सोनम वांगचूक यांनी २८ जून २०२६ पासून नवी दिल्लीतील जंतरमंतर येथे आमरण उपोषण सुरू केले होते. या आंदोलनाची दखल घेऊन केंद्र सरकारने विद्यार्थ्यांच्या हितासाठी सकारात्मक निर्णय घ्यावेत, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तसेच, आंदोलनादरम्यान सोनम वांगचूक यांना अटक करण्यात आल्याच्या घटनेचाही निषेध व्यक्त करण्यात आला.

भारतीय संविधान प्रत्येक नागरिकाला शांततामय मार्गाने आंदोलन करण्याचा आणि न्यायाची मागणी करण्याचा अधिकार देत असल्याचे नमूद करत, या अधिकारांचे संरक्षण करणे ही लोकशाही व्यवस्थेची जबाबदारी असल्याचे निवेदनात अधोरेखित करण्यात आले. देशातील युवकांच्या भविष्याशी संबंधित प्रश्नांवर तातडीने उपाययोजना करून स्पर्धा परीक्षा पारदर्शक आणि विश्वासार्ह पद्धतीने घेण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारावी, तसेच विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेली अस्वस्थता दूर करण्यासाठी आवश्यक पावले उचलावीत, अशी मागणीही संविधान प्रेमी नागरिक मंचाने केली आहे. हे निवेदन मुकुंदभाऊ सपकाळे, जयसिंग वाघ, प्रा. प्रितीलाल पवार, प्रा. किसन हिरोळे, चंद्रगुप्त सुरवाडे, दिलीप सपकाळे, जगदीश सपकाळे, श्रीकांत बावीस्कर, गोपाल भालेराव, सोमा भालेराव, महेंद्र केदार, वाल्मीक जाधव, सुभाष साळुंखे, संध्या तायडे, काजल वाघ, निलुताई इंगळे, प्रतिभा घोडेश्वर, मुकुंद नन्नवरे, वैशाली झालटे, डॉ. प्रकाश वानखेडे यांच्यासह अनेक संविधान प्रेमी नागरिकांच्या उपस्थितीत जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपतींकडे पाठविण्यात आले.

# फेसबुक पोस्टवरून मंत्री गिरीश महाजनांची बदनामी

## बीडमधील तरुण जळगाव सायबर पोलिसांच्या जाळ्यात; आक्षेपार्ह फोटो व मजकूर सोशल मीडियावर प्रसारित

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी**

राज्याचे जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री गिरीश महाजन यांच्याविषयी सोशल मीडियावर आक्षेपार्ह आणि दिशाभूल करणारी पोस्ट प्रसारित करून त्यांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न करणाऱ्या बीड जिल्ह्यातील एका तरुणाला जळगाव सायबर पोलिसांनी अटक केली आहे. तांत्रिक विश्लेषण, डिजिटल पुरावे आणि सोशल मीडिया तपासाच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. आरोपीकडून गुन्ह्यात वापरण्यात आलेला मोबाईल जप्त करण्यात आला असून, तपास पूर्ण झाल्यानंतर त्याच्याविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

सायबर पोलीस ठाण्यात दाखल गुन्हा क्रमांक १७/२०२६ नुसार, जळगाव महापालिकेचे नगरसेवक



अरविंद भगवान देशमुख (वय ४५) यांनी १९ जून २०२६ रोजी फिर्याद दाखल केली होती. फिर्यादीत नमूद केल्याप्रमाणे, "भारत बालाजी म्हस्के" या नावाने तयार करण्यात आलेल्या फेसबुक खात्यावरून मंत्री गिरीश महाजन यांच्यासोबत एका मुलीचा फोटो पोस्ट करण्यात आला होता. त्या फोटोसोबत दिशाभूल करणारा, बदनामीकारक आणि समाजात चुकीचा संदेश जाईल असा मजकूर प्रसारित करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला होता.

तक्रारीची गंभीर दखल घेत पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक संदीप गावित आणि सायबर पोलीस निरीक्षक प्रदीप वाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष तपास पथकाची नियुक्ती करण्यात आली. सायबर तज्ज्ञांनी संबंधित फेसबुक खात्याचा डिजिटल मागोवा घेत आयपी अ‍ॅड्रेस, मोबाईल क्रमांक, लॉगिन माहिती आणि इतर तांत्रिक बाबींचे सखोल विश्लेषण केले. या तपासातून आरोपीची ओळख पटली.

तपासादरम्यान बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील भारत बालाजी म्हस्के (वय ३४) हा संशयित असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर सायबर पोलिसांच्या पथकाने पुणे जिल्ह्यातील इंदापूर येथे सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने संबंधित फेसबुक पोस्ट आपणच प्रसारित केल्याची कबुली दिली.

पोलिसांनी आरोपीकडून गुन्ह्यात वापरण्यात आलेला सुमारे ३० हजार रुपये किमतीचा Oppo Reno 15 5G मोबाईल जप्त केला आहे. आरोपीला भारतीय नागरी सुरक्षा संहिता (BNSS) कलम ३५(३) अंतर्गत नोटीस बजावण्यात आली असून, तपासाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

या प्रकरणात आणखी एक महत्त्वाची कारवाई करत सायबर पोलिसांनी फेसबुक प्रशासनाशी समन्वय साधला. संबंधित आक्षेपार्ह पोस्ट तातडीने हटविण्यात आली असून, सुमारे सहा हजार फॉलोअर्स असलेले संबंधित फेसबुक खाते कायमस्वरूपी निलंबित (Suspend) करण्यात आले आहे. त्यामुळे सोशल मीडियावर खोटी माहिती आणि बदनामीकारक मजकूर प्रसारित करणाऱ्यांना पोलिसांनी स्पष्ट इशारा दिला आहे.

### सायबर पोलिसांचा स्पष्ट इशारा....

सायबर पोलिसांनी नागरिकांना सोशल मीडियाचा वापर जबाबदारीने करण्याचे आवाहन केले आहे. कोणत्याही व्यक्ती, लोकप्रतिनिधी किंवा सार्वजनिक पदावरील व्यक्तीबाबत खोटी, आक्षेपार्ह किंवा दिशाभूल करणारी माहिती प्रसारित करणे हा गंभीर सायबर गुन्हा असून अशा प्रकरणांमध्ये कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असे पोलिसांनी प्रसिद्धीपत्रकातून नमूद केले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने सोशल मीडियावरील प्रत्येक हालचालीचा मागोवा घेणे शक्य असल्याने अशा प्रकारचे कृत्य करणाऱ्यांना कायद्याच्या कचाट्यातून सुटका मिळणार नाही, असा स्पष्ट इशाराही सायबर पोलिसांनी दिला आहे.

# भडगाव नगराध्यक्ष रेखा मालचे यांना मोठा दिलासा



जन सम्राट टाईम्स

**भडगाव | प्रतिनिधी:** भडगाव नगरपरिषदेच्या लोकनियुक्त नगराध्यक्ष सौ. रेखा प्रदीप मालचे यांना जात पडताळणी समितीकडून मोठा दिलासा मिळाला आहे. त्यांच्या जात वैधता प्रमाणपत्राविरोधात दाखल करण्यात आलेली तक्रार समितीने फेटाळून लावत त्यांचे 'भिल्ल' जातीचे वैधता प्रमाणपत्र कायम ठेवले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सौ. रेखा मालचे यांना सन २०१४ मध्ये नंदुरबार येथील जात पडताळणी समितीकडून 'भिल्ल' अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र देण्यात आले होते. त्यानंतर २०२५ मध्ये झालेल्या भडगाव नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत त्यांनी अनुसूचित जमातीसाठी राखीव जागेवरून निवडणूक लढवून विजय मिळवत लोकनियुक्त नगराध्यक्षपद पटकावले. निवडणुकीनंतर त्यांच्याविरोधात प्रतिस्पर्धी उमेदवार सुशीला शांताराम पाटील यांनी धुळे येथील जात पडताळणी समितीकडे जात वैधता प्रमाणपत्राबाबत लेखी तक्रार दाखल केली होती. या तक्रारीवर समितीने दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर तक्रार फेटाळून लावत जात वैधता प्रमाणपत्र कायम ठेवण्याचा निर्णय दिला. या प्रकरणात नगराध्यक्ष रेखा मालचे यांच्या वतीने ॲड. बी. टी. अहिरे यांनी बाजू मांडली, तर ॲड. समाधान सोनवणे यांनी सहकार्य केले. समितीच्या निर्णयानंतर भडगाव परिसरात रेखा मालचे यांच्या समर्थकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. रेखा मालचे यांची प्रतिक्रिया "सत्याचा विजय झाला आहे. विरोधकांनी केवळ राजकीय आकसापोटी व जनतेने नाकारल्याचा राग काढण्यासाठी ही तक्रार केली होती.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

# बुद्धिबळ दिन: विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाला चालना

## बुद्धिबळातून निर्णयक्षमतेचा संदेश

जन सम्राट टाईम्स

**पारोळा | प्रतिनिधी :** आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ दिनानिमित्त आयडियल इंग्लिश मीडियम स्कूल, पारोळा येथे विद्यार्थ्यांसाठी बुद्धिबळ स्पर्धेचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाला चालना देणे, तर्कशक्ती आणि निर्णयक्षमता विकसित करणे या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. स्पर्धेचे उद्घाटन शाळेचे मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. पंकज पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष संकेत पाटील आणि उपमुख्याध्यापिका सौ. पूजा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटनप्रसंगी विद्यार्थ्यांना बुद्धिबळाच्या माध्यमातून जीवनातील नियोजन, संयम आणि विचारपूर्वक निर्णय घेण्याचे महत्त्व पटवून देण्यात आले. यावेळी उपाध्यक्ष संकेत पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, बुद्धिबळ हा केवळ मनोरंजनाचा खेळ नसून तो बौद्धिक विकासासाठी अत्यंत उपयुक्त आहे. या खेळामुळे विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता, तर्कशक्ती, निर्णयक्षमता, संयम, नियोजन कौशल्य आणि समस्या सोडविण्याची क्षमता विकसित होते. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने अभ्यासाबरोबरच अशा बौद्धिक खेळांमध्येही सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमात मनोज पाटील सर यांनी जागतिक बुद्धिबळ संघटना (FIDE) तसेच आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ दिनाचा इतिहास आणि महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. भारताने



जागतिक बुद्धिबळ क्षेत्रात केलेली उल्लेखनीय कामगिरी, भारतीय ग्रँडमास्टर्सचे योगदान आणि देशाची वाढती आंतरराष्ट्रीय ओळख याबाबतही त्यांनी माहिती दिली. तसेच नेहा जावरे मॅडम यांनी भारतातील बुद्धिबळ क्षेत्रातील यशस्वी खेळाडूंची माहिती देत विद्यार्थ्यांना या खेळातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना सातत्यपूर्ण सराव, आत्मविश्वास आणि शिस्त यांच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते, असा संदेश दिला. स्पर्धेत विविध इयत्तांमधील विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने सहभाग घेत आपली बुद्धिमत्ता आणि रणनीतीचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. नियोजन आणि कौशल्याचा उत्कृष्ट संगम घडवून आणला. स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये निरोगी स्पर्धात्मक भावना निर्माण झाली असून त्यांना आपल्या बौद्धिक क्षमतांचा विकास करण्याची संधी मिळाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षकवृंद आणि शाळेच्या कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.मान्यवरांनी स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक करत भविष्यातही अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येईल, असा विश्वास व्यक्त केला.

# जामखेड-कर्जत मार्गावर भीषण अपघात; दोन शासकीय कर्मचाऱ्यांचा जागीच मृत्यू

## चारचाकी-आयशर टेम्पोची समोरासमोर धडक

जन सम्राट टाईम्स


**अहिल्यानगर | प्रतिनिधी :** जामखेड-कर्जत मार्गावरील पाटोदा (गरडाचे) गावाजवळ रविवारी मध्यरात्री झालेल्या भीषण अपघातात श्रीगोंदा येथे कार्यरत असलेल्या दोन शासकीय कर्मचाऱ्यांचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. चारचाकी कार आणि आयशर टेम्पो यांच्यात झालेल्या समोरासमोरच्या जोरदार धडकेत दोन्ही वाहनांचा अक्षरशः चक्काचूर झाला. या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, रस्ता दुरुस्तीच्या कामातील निष्काळजीपणामुळे हा अपघात घडल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. या अपघातात निखिल मोतीलाल बहुरे (रा. जाधववाडी, छत्रपती संभाजीनगर, सध्या श्रीगोंदा) आणि रामचंद्र महाजन बहुरे (रा. बेंबळ्याचीवाडी, छत्रपती संभाजीनगर, सध्या श्रीगोंदा) या दोन चुलत भावांचा मृत्यू झाला. निखिल बहुरे हे श्रीगोंदा तहसील कार्यालयात महसूल सहाय्यक म्हणून कार्यरत होते, तर रामचंद्र बहुरे हे श्रीगोंदा पाटबंधारे विभागात मोजणीदार म्हणून सेवा बजावत होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी (दि. १९ जुलै) रात्री अडीच ते तीन वाजण्याच्या सुमारास दोघेही चुलत भाऊ आपल्या मूळ गावी छत्रपती संभाजीनगर येथून श्रीगोंदा येथे नोकरीच्या ठिकाणी एमएच-२० जीई-३५६२ क्रमांकाच्या चारचाकी वाहनातून जात होते. त्याचवेळी एमएच-१४ बीजे-२२९३ क्रमांकाचा आयशर टेम्पो श्रीगोंदा मार्गावरून जामखेडकडे येत होता. पाटोदा (गरडाचे) गावाजवळ रस्त्यावर मोठ्या प्रमाणात भेगा पडल्याने दुरुस्तीचे काम सुरू होते. त्यामुळे एका बाजूची वाहतूक बंद करून एकाच लेनवरून वाहतूक सुरू होती. याच ठिकाणी दोन्ही वाहने समोरासमोर आल्याने भरधाव वेगात त्यांची भीषण धडक झाली. धडक इतकी जबरदस्त होती की कारचा पुढील भाग पूर्णपणे चिरडला गेला आणि दोन्ही शासकीय कर्मचाऱ्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर आयशर टेम्पो चालक घटनास्थळावरून फरार झाला. या प्रकरणी जामखेड पोलीस ठाण्यात टेम्पो चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याचा शोध सुरू आहे. अपघाताची माहिती मिळताच जामखेडचे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी, पोलिस उपनिरीक्षक गणेश वाघ, पोलिस कर्मचारी सचिन चव्हाण व अन्य कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. वाहनाचे लोखंडी पत्रे कापून दोन्ही जखमींना बाहेर काढून जामखेड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले. या घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी संबंधित रस्त्यावरील दुरुस्तीच्या कामात पुरेशा सुरक्षेची उपाययोजना करण्यात न आल्याचा आरोप केला आहे. एकाच लेनवर वाहतूक सुरू असताना योग्य दिशादर्शक फलक, प्रकाशयोजना आणि वाहतूक नियंत्रणाची व्यवस्था नसल्याने हा अपघात घडल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करण्याची मागणीही नागरिकांकडून होत आहे.

# वांगचुक यांच्या मागण्यांना पाठिंबा; न्याय देण्याची सरकारकडे मागणी

## संविधानिक अधिकारांचा सन्मान; आंदोलनकर्त्यांशी संवाद

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी:** देशभरात वारंवार घडणाऱ्या पेपरफुटीच्या घटनांमुळे विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर गंभीर परिणाम होत असल्याच्या पार्श्वभूमीवर प्रख्यात पर्यावरणवादी आणि शिक्षण सुधारक सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला पाठिंबा देत केंद्र सरकारने त्यांच्या मागण्यांचा संवैधानिक दृष्टिकोनातून विचार करून विद्यार्थ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांमार्फत केंद्र सरकारला निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, भारतातील लाखो विद्यार्थी विविध स्पर्धा परीक्षा आणि प्रवेश परीक्षांसाठी अनेक महिने अथक परिश्रम घेतात. मात्र, परीक्षेच्या काही दिवसांपूर्वी प्रश्नपत्रिका फुटल्याच्या घटना वारंवार घडत असल्याने परीक्षा पुढे ढकलल्या जातात किंवा रद्द केल्या जातात. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक, मानसिक आणि आर्थिक



नुकसान होत असून त्यांच्या भविष्याशी खेळ केला जात आहे. निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, या पार्श्वभूमीवर सोनम वांगचुक यांनी विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, परीक्षा प्रणाली पारदर्शक व्हावी आणि पेपरफुटीतील दोषींवर कठोर कारवाई व्हावी, या मागण्यांसाठी दिल्लीतील जंतर-मंतर येथे शांततापूर्ण आंदोलन सुरू केले आहे. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला शांततेच्या मार्गाने आंदोलन करण्याचा आणि आपले मत मांडण्याचा अधिकार दिला असून, अशा आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करणे लोकशाही मूल्यांच्या विरोधात असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर गंभीर परिणाम होत असल्याच्या पार्श्वभूमीवर प्रख्यात पर्यावरणवादी आणि शिक्षण सुधारक सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला पाठिंबा देत केंद्र सरकारने त्यांच्या मागण्यांचा संवैधानिक दृष्टिकोनातून विचार करून विद्यार्थ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांमार्फत केंद्र सरकारला निवेदन सादर करण्यात आले. केंद्र सरकारने विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांची तातडीने दखल घेऊन सोनम वांगचुक यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, पेपरफुटीच्या घटनांमधील दोषींवर कठोर कारवाई करावी, परीक्षा प्रणाली अधिक सुरक्षित आणि पारदर्शक करण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, तसेच आंदोलनकर्त्यांशी संवाद साधून प्रश्न सोडवावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. युवकांचे भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी आणि शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास अबाधित राखण्यासाठी सरकारने तातडीने हस्तक्षेप करून न्याय्य भूमिका घ्यावी, अशी अपेक्षाही निवेदनाद्वारे व्यक्त करण्यात आली आहे.

# लैंगिक छळमुक्त कार्यस्थळासाठी पॉश ॲक्टचे प्रबोधन

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी**

कार्यस्थळी महिलांसाठी सुरक्षित, सन्मानजनक आणि भेदभावमुक्त वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने गोदावरी इंग्लिश मीडियम स्कूल, जळगाव येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ अंतर्गत सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचार्‍यांसाठी "कार्यस्थळी महिलांवरील लैंगिक छळ प्रतिबंध, मनाई व निवारण अधिनियम, २०१३ (पॉश ॲक्ट)" या विषयावर विशेष ओरिएंटेशन कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमातून पॉश कायद्याची माहिती, महिलांचे अधिकार, संस्थेच्या जबाबदाऱ्या आणि सुरक्षित कार्यस्थळाची संकल्पना याविषयी सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या ॲड. डॉ. ललिता सपकाळे यांनी पॉश ॲक्टची आवश्यकता, त्यामागील उद्दिष्टे आणि प्रत्येक संस्थेने या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी का करावी, याचे सविस्तर विवेचन केले. कार्यस्थळी महिलांच्या सुरक्षिततेची जबाबदारी ही केवळ कायद्यापुरती मर्यादित नसून ती प्रत्येक संस्थेची सामाजिक बांधिलकी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी त्यांनी लैंगिक छळाची कायदेशीर व्याख्या, त्याचे विविध प्रकार, कर्मचारी व संस्थेच्या जबाबदाऱ्या, महिलांचे अधिकार तसेच अंतर्गत तक्रार समितीची रचना, कार्यपद्धती आणि तक्रार नोंदविण्याची संपूर्ण प्रक्रिया याबाबत उदाहरणांसह मार्गदर्शन केले. कोणत्याही प्रकारचा लैंगिक छळ किंवा अनुचित वर्तन सहन न करता त्याविरोधात कायदेशीर मार्गाचा अवलंब करण्याचे आवाहनही त्यांनी उपस्थितांना केले. कार्यक्रमादरम्यान शिक्षक व शिक्षकेतर कर्मचार्‍यांनी विविध प्रश्न उपस्थित करून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. संवादात्मक पद्धतीने झालेल्या या सत्रामुळे पॉश ॲक्टविषयी अनेक गैरसमज दूर झाले. तसेच कार्यस्थळी परस्पर सन्मान, समानता, संवेदनशीलता आणि सुरक्षिततेचे वातावरण निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने सजग राहण्याची गरज असल्याचे अधोरेखित करण्यात आले. या ओरिएंटेशनमुळे उपस्थित शिक्षक व कर्मचाऱ्यांना कायदेशीर तरतुदींची माहिती मिळण्याबरोबरच महिलांच्या सन्मानाचे रक्षण करण्यासाठी संस्थात्मक स्तरावर कोणत्या उपाययोजना आवश्यक आहेत, याचीही स्पष्ट जाणीव झाली.

# संघटनात्मक कार्यपद्धतीच्या जबाबदाऱ्यांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन



जन सम्राट टाईम्स

**भुसावळ | प्रतिनिधी :** दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया (भारतीय बौद्ध महासभा) यांच्या भुसावळ तालुका व भुसावळ शहर शाखेच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. १९ जुलै) गांधीनगर येथील धम्मशील बुद्ध विहार येथे एकदिवसीय कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर उत्साहात पार पडले. सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत झालेल्या शिबिराला परिसरातील बौद्ध उपासक, उपासिका आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रशिक्षणाचा लाभ घेतला.

शिबिराची सुरुवात तथागत भगवान बुद्ध आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व वंदन करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भुसावळ तालुका अध्यक्ष राजेश आव्हाड होते. त्यांच्या अध्यक्षपदाला प्रवीण डांगे यांनी अनुमोदन दिले. सूत्रसंचालन आनंदमित्र सपकाळे यांनी केले, तर प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष सुमंगल (रवींद्र) अहिरे यांनी केले. विविध विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन शिबिरात राज्य सचिव डॉ. के. वाय. सुरवाडे, जिल्हाध्यक्ष सुमंगल (रवींद्र) अहिरे, जिल्हा सरचिटणीस सुशीलकुमार हिवाळे, जिल्हा कोषाध्यक्ष डॉ. संजीवकुमार साळवे आणि संघरत्न दामोदरे यांनी कार्यकर्त्यांना विविध विषयांवर मार्गदर्शन केले. यामध्ये संस्थेचे ध्येय व उद्दिष्टे, शाखांचे कामकाज, हिशोब लेखन, कार्यकर्त्यांची आचारसंहिता, संघटनात्मक जबाबदाऱ्या आणि धम्म प्रचारातील शिस्त यांसारख्या विषयांचा समावेश होता. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष रविंद्र वानखेडे, प्रकाश सरदार, बी. एस. पवार, समता सैनिक दलाचे मेजर रमेश साळवे, शहराध्यक्ष प्रवीण डांगे, शहर सचिव युवराज इंगळे, संभाजी सोनवणे, सुरेंद्र हिवाळे, उत्तम सुरवाडे, जयराज धुरंदर, प्रवीण बोदडे, प्रवीण तायडे आदी उपस्थित होते. पदाधिकाऱ्यांचे विशेष योगदान शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी तालुका सरचिटणीस आनंदमित्र सपकाळे, तालुका कोषाध्यक्ष संभाजी सोनवणे, शहराध्यक्ष प्रवीण डांगे, शहर सरचिटणीस युवराज इंगळे आणि शहर कोषाध्यक्ष नितीन सुरवाडे यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# रमान फाउंडेशनच्या पुढाकारातून पाचोऱ्यात भव्य वृक्षारोपण !

## आ. किशोर पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण; नागरिकांनी मोठ्या संख्येने घेतला सहभाग

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी** पर्यावरण संवर्धनाची चळवळ अधिक व्यापक करण्याच्या उद्देशाने अरमान फाउंडेशन, पाचोरा यांच्या वतीने मानसिंगका नगर येथे भव्य वृक्षारोपण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. आमदार किशोर (आप्पा) पाटील यांच्या शुभहस्ते पार पडलेल्या या उपक्रमात नागरिक, युवक, सामाजिक कार्यकर्ते आणि पर्यावरणप्रेमींनी उत्स्फूर्त सहभाग घेत परिसर हिरवागार करण्याचा संकल्प केला. यावेळी आमदार किशोर पाटील यांनी स्वतः वृक्षारोपण करून "झाडे लावा – झाडे जगवा" हा संदेश दिला. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. वाढते प्रदूषण, हवामानातील बदल आणि तापमानवाढ यावर मात करण्यासाठी वृक्षसंवर्धन हाच सर्वात प्रभावी उपाय असल्याचेही त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमाला मार्केट कमिटीचे सभापती गणेश बापू पाटील, नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष किशोर आप्पा बारबकर, माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक संजय भाऊ गोहिल, नगरसेवक राहुल गायकवाड, हाजी



अबोलीस भाई शेख, नगरसेवक संजय चौधरी, युवा उद्योजक मनोज भाऊ पाटील (एमएसपी), सुनील आप्पा जाधव, किशोर पाटील, शरद मराठे, शांताराम पाटील, पप्पू राजपूत, शुभम पाटील, उमेश एरंडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी विविध प्रकारची वृक्षलागवड करून पर्यावरण संवर्धनाची सामूहिक जबाबदारी स्वीकारण्याचा निर्धार व्यक्त केला. परिसर अधिक हिरवागार करण्यासाठी आणि भावी पिढीसाठी स्वच्छ व निरोगी पर्यावरण निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांची सातत्याने गरज असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. अरमान फाउंडेशनच्या वतीने भविष्यातही पर्यावरण, सामाजिक जनजागृती आणि समाजहिताचे विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

### झाडे जगवा, पर्यावरण वाचवा

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी किशोर पुराणिक, विकी मराठी, राजू भैया, संजू पाटील, प्रशांत पाटील, प्रकाश चौधरी, प्रशांत भावसार, अमोल जाधव, पप्पू जाधव, संजय कानडे, गणेश चौधरी यांच्यासह सर्व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी अरमान फाउंडेशनचे अध्यक्ष फहीम शेख यांनी उपस्थित मान्यवर, नागरिक आणि स्वयंसेवकांचे आभार मानले. "झाडे लावा – झाडे जगवा, पर्यावरण वाचवा – भविष्य घडवा" हा संदेश देत कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. झाड लावून त्याचे संगोपन करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. वाढते प्रदूषण, तापमानवाढ यावर मात करण्यासाठी वृक्षसंवर्धन हाच सर्वात प्रभावी उपाय असल्याचेही त्यांनी नमूद केले.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306